10 Rs.

दस रुपये

भारत

सत्यमेव जयते

INDIA

१० रु. 10 RS.

TEN RUPEES

अनु. क्र. ९१४३९ दिनांक ९।५।०४ रुपये १० एस. के. लोखंडे

नाव डॉ. एस. आय. एज्युकेशन सो. स्टॅम्प व्हेंडर

पत्ता गणेश पेठ पुणे मोबीज हॉटेल कम्पाऊंड,

हस्त एस. एम. पठाण ला. नं. हवेली नं. २ (१०)

पुणे - ४११ ००१

(१)

11 4 JAN 2004

**करारनामा**

आज दिनांक २४ ,माहे ५ ,इसवीसन २००४ वार सोमवार ,या दिवशी कारणे करारनामा लिहून देतो की,

दारुवाला पूल मस्जीद ट्रस्ट
मुंबई पब्लिक ट्रस्ट अ‍ॅक्ट अन्वये
नोंदणीकृत संस्था
नोंदणी क्रमांक B –१०१ Pn
५००,गणेश पेठ, पुणे-२
यांचेसाठी व वतीने
खालील ट्रस्टी ( विश्वस्त )

१ ज. सययद चांद सययद इस्माईल
२ ज. सिकंदर मुबारक पठाण
३ ज. शेख अशफाक मो. शफी
४ ज. शेख मो. सलिम नूरमोहम्मद
५ ज. शेख सईद हबीबूर रेहमान
६ ज. शेख मुहम्मद हनिफ (पाचा)
७ ज. शेख मेहबुब नुरमोहम्मद

लिहून घेणार

यांसी

अंजुमन-ए-फैजूल इस्लाम एज्युकेशन सोसायटी
नोंदणीकृत संस्था
नोंदणी क्रमांक F 884 Pn.
५००,गणेश पेठ पुणे-२

NOTARY
A. Rashid D. Sayed
Puna
Regd. No 679
STATE OF MAHARASHTRA

10 Rs.

दस रुपये

सत्यमेव जयते

भारत

INDIA

१० रु. 10 Rs.

TEN RUPEES

अनु. क्र ०११३८ दिनांक १६।१।०४ रुपये १०८ एस. के. लोखंडे

नाव ओ. एफ. आय. एज्युकेशन सो.

पत्ता गणेशपेठ पुणे २

हस्ते एस. एम. पठाण

स्टॅम्प व्हेंडर
मोबोज हॉटेल कम्पाऊंड,
ला. नं. हवेली नं. २ (५०)
पुणे - ४११००१

14 JAN 2004

उपकोषागार अधिकारी पुणे करिता

NOTARY
A. Rashid D. Sayed
Pune
Regd. No. 679
STATE OF MAHARASHTRA

<2>

यांचेसाठी व वतीने
खालील ट्रस्टी ( विश्वस्त )

१ ज. मिर्झा इनायत बेग
२ कु. नसीम अे. ओमर
३ ज. सिकंदर मुबारक पठाण लिहून देणार
४ ज. मुश्ताक उमर पटेल
५ ज. पंडेर अ. रशीद
६ ज. शेख मोहम्मद अशफाक शफी ७) सय्यद चांद इस्माईल ८) शेख मो. सलीम नूरमोहम्मद

कारणे करारनामा लिहून देतात की

करारनामा लिहून देणारी संस्था अंजुमन-ए-फैजूल इस्लाम ही सहकार कायद्यातील व मुंबई पब्लिक ट्रस्ट कायद्यातील तरतुदीस अनुसरुन नोंदणीकृत झालेली शैक्षणिक संस्था आहे. मुस्लिम समाजात शिक्षणाचा जास्तीत जास्त प्रसार व्हावा, आर्थिकदृष्टया दुर्बल गटातील व त्याचप्रमाणे मुस्लिम समाजातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबातील मुले शिक्षणापासून वंचित राहू नये या केवळ एकाच उद्देशाने दारुवाला पूल मशिदीचे आवारातील मान्यताप्राप्त उर्दू प्राथमिक शाळा वरील शैक्षणिक संस्था गेल्या ७१ वर्षांपासून चालवित आहे. त्याचबरोबर सदर शैक्षणिक संस्थेने याच आवारातील जागेत उर्दू माध्यमिक शाळा गेल्या ७ वर्षापासुन सुरु केली असून सदर उर्दू माध्यमिक शाळेस महाराष्ट्र शासनाने मान्यता दिली आहे.. प्राथमिक व माध्यमिक शाळेचा व्याप दिवसोंदिवस वाढत आहे.
मशिदीच्या आवारात असलेली उर्दू माधमिक शाळेचा एस.एस.सी.चा निकाल दरवर्षी चांगला लागत आहे. चालू २००२-०३ या शैक्षणिक वर्षात शाळेचा एस.एस.सी.चा निकाल ९० टक्क्यांपर्यंत गेला आहे व दरवर्षी त्यात प्रगतीच होणार आहे. शाळेत विविध शालेय उपक्रमही राबविण्याचा संस्थेचा प्रस्ताव आहे. परंतु जागेअभावी त्यास मर्यादा येतात. करारनामा लिहून देणार शैक्षणिक संस्थेची इच्छा असूनही केवळ जागेच्या अभावी विद्यार्थ्यांना उपयुक्त असे शालेय उपक्रम, उदा. वाचनालय,प्रयोगशाळा,

10 Rs.

दस रुपये

सत्यमेव जयते

भारत INDIA

१०रु. 10 Rs.

TEN RUPEES

अनु. क्र. ९१४३६ दिनांक ९।१।०४ रुपये १०/-

नाव अे. एस. आय एज्युकेशन सो

पत्ता गणेश पेठ पुणे

हस्त एस एम पवार

एस. के. लोखंडे
मुद्रांक विक्रेता
मोती हॉटेल कंपाउंड,
सा. न. हवेली नं. २ (१०)
पुणे - ४११ ००१

14 JAN 2004

दुय्यम निबंधक कार्यालय अधिकारी
कोषागार, पुणे करिता

<3>

शिक्षणाशिवाय समाजाची उन्नतीही होणार नाही. या सर्व बाबींचा विचार करुन करारनामा लिहून देणार शैक्षणिक संस्था व लिहून घेणार दारुवाला पूल मस्जिदच्या विश्वस्तांची एकत्रित बैठक होउन लिहून घेणार ट्रस्ट यांच्या मालकी वहीवाटीची पुणे येथील रास्ता पेठ येथे असलेल्या खालील तपशिलात नमुद केलेल्या मिळकतीवर लिहून देणार या शैक्षणिक संस्थेने शाळेसाठी ईमारत बांधावी असे ठरविले.

NOTARY ★ A.Rashid D. Savan Pune Regd. No 579 STATE OF MAHARASHTRA

मिळकतीचा तपशील

| अ.क्र. | सिटीसर्व्हे क्रमांक | क्षेत्र ( चौ. मि ) |
|---|---|---|
| १. | ७६५ | ११७.१ |
| २. | ७६६ | २८०.१ |
| ३. | ७६७ | ९३.६ |
| | | ४९१.६ |
| | | एकूण क्षेत्रं ( चौ. मि. ) |

वरील मिळकत लिहून घेणार या नोंदणीकृत संस्थेच्या मालकीहक्काची व वहिवाटीची असून वरील जागा सध्या मोकळी आहे.. सदर जागेत इमारत बांधून ती लिहून देणार संस्थेला शाळेसाठी उपलब्ध करुन देण्याची करारनामा लिहून घेणार या संस्थेची आर्थिक कुवत नाही. लिहून देणार या शैक्षणिक संस्थेस यांच्या भावी प्रकल्पासाठी प्रशस्त ईमारतीची आवश्यकता असल्याने वर परिच्छेद क्रमांक मध्ये असलेल्या मोकळ्या जागेत लिहून देणार या शैक्षणिक संस्थेने शाळेची स्वंतत्र

10 Rs.

दस रुपये

सत्यमेव जयते

भारत

INDIA

१०रु. TEN RUPEES 10Rs.

अनु.क्र. ८९४३६ दिनांक २६।१।०४ रुपये १० एस. के. लोखंडे

नाव ओ.एम.आय. एज्युकेशन सो.

पत्ता गविरा पेठ पुणे

हस्त एस. एम. पवार

स्टॅम्प व्हेंडर

पुणे - ४११००१

NOTARY STATE OF MAHARASHTRA A. Rashid D. Sayed Pune Regd. No 679

14 JAN 2004

〈4〉

ईमारत बांधण्याचा प्रस्ताव दिला,त्यावर वरील दोन्ही संस्थेच्या विश्वस्तांनी सर्व बाबींचा विचार करुन करारनामा लिहून देणार या संस्थेस वरील जागेत ईमारत बांधून देण्याचे ठरविले आहे. व त्यासाठी

खालील अटी व शर्ती निश्चित केल्या आहेत.

१. करारनामा लिहून घेणार संस्थेने त्यांची पुणे, रास्ता पेठ येथील मिळकत सीटीएस क्रमांक ५६५,५६६,५६७ एकूण क्षेत्रफळ ४३१.६ चौ.मिटर वर प्रस्तावित शाळेच्या बांधकामासाठी ईमारत बांधण्यास लिहून घेणार या संस्थेची हरकत असणार नाही.

२. लिहून घेणार या संस्थेच्या मालकीच्या वरील जागेत लिहून देणार या शैक्षणिक संस्थेने त्यांच्या खर्चाने प्रस्तावित शाळेचे ईमारतीचे बांधकाम पुणे महानगरपालिका यांचेकडील बांधकाम परवानगी मिळवून व महानगरपालिकेने मान्य केलेल्या बांधकाम नकाशाप्रमाणे प्रस्तावित ईमारतीचे बांधकाम करावयाचे आहे.

3. शाळेच्या ईमारतीचे बांधकाम लिहून देणार संस्था ही त्यांच्या खर्चाने करणार असली तरी उक्त जागेत होणारी ईमारत / ईमारती यांची संपुर्ण मालकी लिहून घेणार या संस्थेचीच राहील.

४. प्रस्तावित ईमारत बांधकामाचा झालेला व होणारा खर्चाचा बाबनिहाय तपशिल प्रत्येक महिन्याचा २ व १६ तारखेस वरील शिक्षण संस्थेने करारनामा लिहून घेणा-या संस्थेस दयावयाचा आहे.

५. प्रस्तावित ईमारत / ईमारतीचे बांधकाम पुर्ण झाल्यानंतर त्याच्या पुर्णत्वाचे प्रमाणपत्र महानगरपालिकेकडून घेण्याची जबाबदारी वरील शैक्षणिक संस्थेची राहील.

10 Rs.

दस रुपये

सत्यमेव जयते

भारत

INDIA

१०रू. TEN RUPEES 10Rs.

अनु. क्र. ____ दिनांक ____ रुपये ____

नाव ____

पत्ता ____

हस्ते ____

एस. के. लोखंडे

स्टँम्प व्हेंडर

NOTARY A.Rashid D. Sayed Pune Reg. No. 679 STATE OF MAHARASHTRA

14 JAN 2004

६. ईमारत / ईमारतीच्या बांधकामासाठी केलेला संपुर्ण खर्चावर लिहून देणार या संस्थेस व्याजाची आकारणी करता येणार नाही.

७. करारनामा लिहून घेणार यांच्या मालकीच्याच वरील जमिनीवर शाळेसाठी उपयोगात आणावयाच्या ईमारतीचे बांधकाम होणार असल्याने होणारी ईमारत / ईमारती ह्या करारनामा लिहून घेणा-या संस्थेच्या मालकीच्या राहतील.

८. शाळेसाठी झालेल्या इमारतीची महानगरपालिकेकडून होणारी कर आकारणी अथवा त्यामध्ये करुन घ्यावयाची सुट ही करारनामा लिहून घेणार दारुवाला पुल मस्जिद ट्रस्ट यांनी करुन घ्यावयाची आहे. त्यासाठी लागणारी आवश्यक माहिती वरील संस्थेने दयावयाची आहे.

९. शाळेच्या ईमारतीचे संपूर्ण बांधकाम झाल्यानंतर त्यावर झालेल्या बाबनिहाय खर्चाची माहिती शिक्षणसंस्थेने दारुवाला पूल मस्जीद ट्रस्टला दयावयाची आहे.

१०. ईमारत ईमारतीचे बांधकामास झालेला प्रत्यक्ष खर्च निश्चित झाल्यानंतर वसूली शिक्षण संस्थेने दारुवाला पूल मस्जीद ट्रस्ट यांचेकडून खालीलप्रमाणे वसूल करण्याचे निश्चित केले आहे.

११. शाळेसाठी वापरात यावयाच्या मिळकतीचे भाडे शासन नियमानुसार पुणे महानगरपालिका शिक्षण मंडळ अथवा जिल्हा परिषद पुणे ( शिक्षण विभाग ) यांचेकडून प्रत्येक महिन्याला मिळते. अशा प्रकारची भाड्याच्या स्वरूपात मिळणारी रक्कम स्विकारण्याचा अधिकार करारनामा लिहून घेणार दारुवाला पूल मस्जिद ट्रस्टने ईमारतीच्या झालेल्या बांधकामापोटी ५० टक्के रक्कम वरील शिक्षण संस्थेस दयावयाची आहे. सदरची बाब लिहून देणार संस्थेने मान्य केली आहे.

१२. शाळेच्या इमारतीचा दुरुस्ती देखभालीचा खर्च लिहून देणार शिक्षण संस्थेने करावयाचा आहे. त्याची

१३. सदरची ईमारत फक्त शैक्षणिक कामासाठीच वापरण्यात येईल.

१४. करारनामा लिहून घेणार दारूवाला पुल मसजिद ट्रस्ट व करारनामा लिहून देणार अंजुमन ए फैजूल इस्लाम एज्युकेशन सोसायटी या शैक्षणिक संस्थेने दारूवाला पुल मसजिद ट्रसट या संस्थेच्या पुणे रास्तापेठ येथील त्यांच्या मालकीच्या सीटीएस कमांक ५६५, ५६६, ५६७ या मिळकतीच्या एकूण क्षेत्रावर शाळेची ईमारत बांधून देण्यासाठी वरील अटी शर्ती निश्चित केल्या आहेत. व त्या उभयपक्षांना मान्य आहेत. यदाकदाचित वरील दोन्ही संस्थेचे सदस्य बदलल्यास नविन नियुक्त झालेल्या सदस्यावर सदरचा करारनामा बंधनकारक राहील.

सदरचा करारनामा आज दिनांक २४-५-२००४ रोजी लिहून दिला.

| अंजुमन ए फैजुल इस्लाम शिक्षण संस्था | मसजिद ट्रस्टी |
|---|---|
| १) मिर्झा इनायत बेग महेबुब बेग | १) सययद चाँद ईस्माईल |
| २) अलहज मिस नसीम आदम उमर | २) सिकंदर मुबारक पठाण |
| ३) अलहज पठाण सिकंदर मुबारक | ३) शेख मुहम्मद अशफाक शफी |
| ४) पटेल मुश्ताक अहमद उमर | ४) शेख सलिम नुरमोहम्मद |
| ५) अलहज शेख मोहम्मद अशफाक शफी | ५) शेख सईदुरहमान हबीबुरहमान |
| ६) अलहज पंडेर रशीद | ६) शेख मुहम्मद हनिफ ( चाचा ) |
| ७) सययद चाँद ईस्माईल | ७) शेख मेहबुब नुरमोहम्मद |
| ८) अलहज शेख मो. सलीम नूरमोहम्मद | |

CERTIFIED BY
Vaman S. Solanke
Advocate
Vadgaon Sheri, Pune-14

NOTARY STATE OF MAHARASHTRA
A. Rashid D. Sayed Pune Regd. No. 679

BEFORE ME
A. Rashid D. Sayed
Notary State of Maharashtra
Pune. Regd. Sr. No. 825/05
24 MAY 2004